# कोव्हिड १९चा मुकाबला करण्याच्या देशाच्या प्रयत्नांना पाठबळ देण्यासाठी फ्लिपकार्ट स्मार्टबायकडून हँड सॅनिटायझर्स आणि सर्जिकल मास्क्सचे अनावरण

- सरकारच्या सूचनेनुसार सॅनिटायझरची ५०० मिली बाटली २५० रुपयांना आणि १५ सर्जिकल मास्क्सचे (३ प्लाय मेल्टब्लोन फेस मास्क) पाकिट २४० रुपयांपासून उपलब्ध
- वैद्यकीयदृष्ट्या प्रमाणित केलेली ही उत्पादने फ्लिपकार्टच्या हेल्थ+ श्रेणीअंतर्गत उपलब्ध होणार

**बंगळुरू, ०९ एप्रिल २०२०** : अत्यावश्यक वैद्यकीय उत्पादने उपलब्ध करून देण्याच्या देशाच्या प्रयत्नांना पाठबळ देण्यासाठी भारतात विकसित झालेली ई-कॉमर्स बाजारपेठ असलेल्या फ्लिपकार्टने फ्लिपकार्ट स्मार्टबाय या आपल्या खासगी ब्रँडच्या हेल्थ+ श्रेणीत आजपासून वैद्यकीयदृष्ट्या प्रमाणित हँड सॅनिटायझर्स आणि सर्जिकल मास्क्स उपलब्ध करून दिले आहेत. कोव्हिड-१९च्या साथीमुळे ग्राहकांकडून असलेली वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी स्थानिक पातळीवर उत्पादित केलेल्या या वस्तू आपल्या अस्तित्वातील यंत्रणेचा वापर करून उपलब्ध करून देण्याचे फ्लिपकार्टचे उद्दिष्ट आहे.

सुरक्षितता आणि गुणवत्ता यांच्याशी कुठलीही तडजोड न करता फ्लिपकार्ट स्मार्टबाय हेल्थ+ हँड सॅनिटायझर्सची ५०० मिलीची बाटली सरकारच्या निर्देशांनुसार २५० रुपयांत उपलब्ध करून दिली जाणार आहे. डब्ल्यूएचओने शिफारस केल्याप्रमाणे अल्कोहोलचे प्रमाण ठेवून एफडीए मान्यताप्राप्त मिश्रणानुसार हे सॅनिटायझर बनवण्यात आले आहेत. याखेरीज ९५ टक्क्यांपर्यंत गाळणक्षमता असलेल्या फ्लिपकार्ट स्मार्टबाय सर्जिकल मास्क्सची (३ प्लाय मेल्टब्लोन फेस मास्क्स) १५, २०, ३० आणि ५० नगांची पाकिटे अनुक्रमे रु. २४०, रु. ३१०, रु. ४०० आणि रु. ५७५ या किमतीत उपलब्ध आहेत.

या 'न भूतो...' अशा कसोटीच्या काळात कोव्हिड-१९च्या साथीशी मुकाबला करण्याच्या देशाच्या प्रयत्नांना प्रत्येक खासगी आणि सार्वजनिक उपक्रमांनी हातभार लावणे हे त्यांचे कर्तव्य आहे. फ्लिपकार्टच्या माध्यमातून आम्ही ग्राहकांना त्यांच्या घरापर्यंत वाणसामान आणि जीवनावश्यक वस्तू आणून देत आहोत. लोकांना आपल्या घरातच राहाणे शक्य व्हावे, त्यांना सोशल डिस्टन्सिंग पाळता यावे आणि तरीही त्यांना आवश्यक वस्तू मिळत राहाव्यात, यात ई-कॉमर्स महत्त्वाची भूमिका बजावत आहे. ग्राहकांकडून या उत्पादनांना असलेली मागणी सातत्याने वाढत असून ती पूर्ण करण्यासाठी फ्लिपकार्टही आपले प्रयत्न वाढवत असून ग्राहकांना आवश्यक त्या वस्तू योग्य किमतीत मिळाव्यात, यासाठी आपली क्षमता, व्याप्ती, पायाभूत सुविधा आणि स्त्रोतांचा यथायोग्य वापर केला जात आहे.

फ्लिपकार्ट स्मार्टबाय हेल्थ+ हँड सॅनिटायझर आणि फ्लिपकार्ट स्मार्टबाय सर्जिकल मास्क्स हे फ्लिपकार्टच्या व्यासपीठावर अत्यावश्यक श्रेणीतील पर्सनल केअर विभागात उपलब्ध असतील.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants and small businesses to be a part of India's e-commerce revolution. With a registered customer base of over 200 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, driving access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs has driven us to innovate on many industry firsts. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the

online fashion market, and PhonePe, India’s fastest growing digital payments platform, the Flipkart Group is steering the transformation of commerce in India through technology.

**For more details contact media@flipkart.com**.